श्रद्धांजली

जाणते संगीतकार, अनेक मान्यवर गायक-गायिकांचे लाडके गुरू, संगीताचे गाढे अभ्यासक, नवोदितांसाठी प्रेरणास्रोत अशा अनेक गुणविशेषांनी संपन्न अनिलदांना अखेरचा निरोप देताना...

□ अजित पोपट



अनिलदाः ज्यांनी संगीतातलेच नाही, तर जीवनातील आरोह अवरोहही नेमके जाणले...



सारेगामाच्या अंतिम फेरीत सोनू निगम आणि विजेत्या स्पर्धकांसह दिग्गजांची उपस्थितीः (डावीकडून)ओ. पी. नय्यर, जगजित सिंग, पंडित जसराज, खैयाम, परवीन सुलताना, अनिल बिश्वास, कल्याणजी आणि नौशाद

भूतकाळातल्या अनेक आठवणी मनःपटलावर दीर्घ काळ रेंगाळत राहतात. चित्रपट संगीताशी निगडित अशा या दोन घटनाच पहा...

पहिला प्रसंगः १९४५चं वर्ष. एका चित्रपट गीताचं रेकॉर्डिंग आहे. नवोदित गायक सोनेरी भविष्याची स्वप्नं पाहात ते गीत गातो. ते पूर्ण होताक्षणीच वादक मंडळी, तंत्रज्ञ, टाळ्यांचा कडकडाट करून गायकाचं कौतुक करतात. तो नवोदित गायक कौतुकाच्या अपेक्षेने संगीतकाराकडे बघतो.

गायकाला एका बाजूला घेऊन संगीतकार त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणतो, 'तू खरंच खूप सुंदर गातोस. तुझा गळाही गोड आहे. पण सायगलची नक्कल करणं सोडून दे. स्वतःची शैली विकसित कर. नाहीतर लोक तुला 'व्हॉईस ऑफ सायगल' म्हणून विसरून जातील...


दुसरा प्रसंगः असंच एक रेकॉर्डिंग. पुन्हा टाळ्यांचा तोच गजर. तसाच अभिनंदनाचा वर्षाव. किरकोळ बांध्याच्या त्या गायिकेला पित्याच्या आपुलकीने संगीतकार समजावतात, 'एक नूरजहाँ तर आपल्याकडे आहेच. अस्सल आवाज हजर असताना नकलेला विचारणार कोण? तू तुझ्या प्रतिभेचा तुझ्या शैलीत विकास कर. मुख्य म्हणजे गाताना श्वासोच्छ्वासाचा आवाज माइकमध्ये पकडला जाणार नाही याची काळजी घेत कसं गायचं, ते मी तुला शिकवेन. भविष्यात तुला त्याचा खूप फायदा होईल...

पहिला प्रसंग *पहिली नजर*(मोतीलाल, वीणा, मुनव्वर सुलताना) चित्रपटादरम्यानचा. संगीतकार होते अनिल विश्वास आणि तो नवोदित गायक होता मुकेश. ते ऐतिहासिक गीत होतं–*'दिल जलता है तो जलने दे, आंसू न बहा फरियाद न कर...'*

मुकेशचं काही ते पहिलंच गाणं नव्हतं. त्यापूर्वी १९४१मध्ये *निर्दोष* चित्रपटासाठी मुकेशने पार्श्वगायन केलं होतं. पण *'दिल जलता है तो...'*ने त्याला एका रात्रीत लोकप्रियता मिळवून दिली. मुकेशने अनिलदांचा सल्ला मानला. त्याने स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली. परिणामी १९४७ नंतर राज कपूरच्या चित्रपटांतून मुकेश वारंवार आपल्यासमोर येऊ लागले.

दुसरा प्रसंग *अनोखा प्यार*(१९४८- दिलीपकुमार, नरगीस, नलिनी जयवंत) गायिका लता. संगीतकार तेच, अनिलदा. गाणं होतं– *'याद रखना चांद तारों इस सुहानी रात को...'* लताजींच्या मते अनिलदांबरोबर हे त्यांचं पहिलंच गाणं नव्हतं. त्याआधी *गर्ल्स स्कूल*साठी त्यांनी अनिलदांच्या संगीतात पार्श्वगायन केलं होतं. 'अनिलदांनी मला गाताना श्वास घेण्याचं आणि सोडण्याचं तंत्र शिकवलं. मी त्याचा सराव केला. आजही मी त्यांनी शिकवलेल्या पद्धतीनेच गाते', लताजी विनम्रपणे सांगतात.

हे दोन्ही प्रसंग अनिलदा अर्थात अनिल विश्वास या संगीतकाराशी जोडलेले आहेत. गेली तीस-पस्तीस वर्षं अनिलदांचं वास्तव्य दिल्लीत होतं. झी टीव्हीवरील सोनू निगम संचालित *सारेगामा* या कार्यक्रमाच्या अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून त्यांना पाचारण करण्यात आलं होतं. त्यावेळी मुंबईला आलेल्या अनिलदांनी 'झी'च्या प्रतिनिधीला सांगितलं की, 'लोकांनी तुम्हाला सक्तीने निवृत्त व्हायला लावण्यापेक्षा आपण सन्मानपूर्वक निवृत्ती स्वीकारणं केव्हाही चांगलं.'



स्वर आणि सूरः गायिका पत्नी मीना कपूरसह अनिलदा

१९३४-३५ला सुरू केलेला संगीतप्रवास स्वखुशीने कोणाविषयी कुठलीही तक्रार न करता आणि मनात किंतु न बाळगता अनिलदांनी १९६२-६३च्या सुमारास आपणहून संपवला. मग ते आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावर रूजू झाले. हिंदी चित्रपटसंगीतात अशी स्वेच्छानिवृत्ती अनिलदा आणि कल्याणजी या दोघांनीच स्वीकारली. कल्याणजी मुंबईत नव्या पिढीला घडवण्याचं काम करत होते तर अनिलदांनी तेच कार्य दिल्लीत राहून केलं. आकाशवाणीच्या सेवेतून मोकळे झालेले अनिलदा जवाहरलाल नेहरू विद्यापीठाशी जोडले गेले. तिथे ते संगीत शिकवू लागले.

१९१४मध्ये म्हणजे पहिल्या विश्वयुद्धाच्या सुमारास अखंड भारतातील बंगाल प्रांतातल्या बारीसाल या गावी अनिलदांचा जन्म झाला.(आज ते बारीसाल बांगलादेशात आहे.) त्यांची आई आपल्या मधुर आवाजात लोकगीतं म्हणत असे. संगीताचे संस्कार त्यांच्यावर अगदी बालपणापासून झाले. लहानवयातच त्यांना संगीताविषयी ओढा वाटू लागला. त्यांची चिमणी बोटं तबल्यावर सराईतासारखी ताल धरू लागली. मुंबईत आल्यावर त्यांनी सर्वप्रथम लोकसंगीत, शास्त्रीय संगीत आणि उर्दू गझलांचा अभ्यास सुरू केला. न्यू थिएटर्समध्ये नेमाने जाऊन ऑर्केस्ट्रेशन कसं होतं त्याची माहिती करून घेतली.

सुरुवातीच्या काळात त्यांनी स्वातंत्र्य संग्रामातही भाग घेतला. पोलिसांचा मार खाल्ला. काही काळ आचाऱ्याचं आणि वाढप्याचं कामही केलं. अनिलदा स्वतः चांगलं गात असत. त्यामुळे कुठलंही काम करताना त्यांचे ओठ नेहमी गुणगुणतानाच दिसत. १९३४मध्ये ते मुंबईत आले त्यापूर्वी काजी नजरूल इस्लाम यांच्याकडे अनिलदा काम करत होते. या काजी नजरूल इस्माइलनी लिहिलेलं *'आमार सोनार बांगला आमी तोमाय भालो बछी...'* हे गीत पुढे बांगलादेशाचं राष्ट्रगीत बनलं.

मुंबईत वर्षभर संघर्ष केल्यानंतर अनिलदांनी *धरम की देवी* या चित्रपटासाठी संगीतकार म्हणून काम केलं. त्यानंतर त्यांना क्षणभर उसंत म्हणून मिळाली नसेल. अखंड संगीतसेवा सुरू झाली. सागर मुव्हीटोन, नंतर बॉम्बे थिएटरमध्ये एकीकडे अशोककुमार, मुखर्जीबंधू यांच्याशी त्यांचा परिचय झाला तर दुसरीकडे प्रदीपजींसारख्या प्रतिभावंताचा सहवास वाढला. कलकत्त्यात तीन वर्षं बॉक्स

ऑफिसवर ठाण मांडून बसलेल्या *किस्मत*साठी त्यांनी प्रदीपजींबरोबर संगीत दिलं.

'आज हिमालय की चोटी से
फिर हमने ललकारा है
दूर हटो अय दुनियावालों
हिन्दोस्तां हमारा है...'

सारखी *किस्मत*ची गाणी आजही त्याच आवडीने ऐकली जातात.

संगीतकार म्हणून अनिलदांची कारकीर्द तीस-बत्तीस वर्षांची होती. या कालावधीत त्यांनी संगीताबरोबरच हिंदी चित्रपटसंगीतात इतरही बरंच मोलाचं योगदान दिलं. मुकेशला सायगलच्या प्रभावातून बाहेर काढून इंडस्ट्रीला एक गुणी गायक दिला. लताजींना ब्रिदिंग टेकनिक शिकवलं. तलत मेहमूदला आवाजातल्या कंपनाचा गाताना कसा उपयोग करायचा त्याचं तंत्र समजावलं, महेंद्र कपूरला महेबूब खानच्या *रोटी* चित्रपटात *'सजना सांज भई आन मिलो, आन मिलो...'* गाणं गायला लावलं.

का कोण जाणे, पण गायक म्हणून अनिलदांची महंमद रफींवर विशेष मर्जी नव्हती. अनिलदांच्या आजवरच्या हिट गाण्यांची यादी पहा. त्यात महंमद रफी हे नाव कुठेच दिसत नाही. रफी वगळता जवळपास सगळ्याच गायकांना त्यांनी संधी दिली. सुरेंद्र- *'पुजारी मोरे मंदिर में आओ...'*-(१९३७, *जागीरदार*), अमीरबाई कर्नाटकी- *'आज हिमालय की चोटी से...'*(१९४३, *किस्मत*)

तीन दशकांची कारकीर्द. सुमारे शंभर चित्रपट. पण या शंभर चित्रपटांतून अनिलदांनी दिलेली सगळीच गाणी अर्थपूर्ण आणि अविस्मरणीय. त्यांच्या सगळ्या गाण्यांचा गायलं होतं.

– *'बदली तेरी नजर तो नजारे बदल गये...'* *बड़ी बहू* चित्रपटातलं हे गाणं लताच्या आवाजातलं होतं.

अनिलदा जाणते संगीतकारच होते असं नाही तर दर्दी श्रोताही होते. खेमचंद प्रकाशनी लताकडून *'आयेगा आनेवाला...'*(*महल*) हे गाणं गाऊन घेतलं तेव्हा अनिलदांनी त्यांची मनापासून स्तुती केली होती. गायिका आशालता या त्यांच्या पहिल्या पत्नी तर गायिका मीना कपूर दुसऱ्या पत्नी. प्रसिद्ध बासरीवादक पन्नालाल घोष अनिलदांचे आप्त होते. अनिलदांची बहीण गायिका-अभिनेत्री पारूल घोष पन्नालाल यांची पत्नी.

१९६०च्या सुमारास हिंदी चित्रपटसंगीताचं वाढतं व्यापारीकरण पाहून अनिलदा व्यथित होत. त्यातच त्यांच्या



शिष्या लता आणि बासरीवादक मेहुणे पन्नालाल घोष यांची सुरेल साथ



मैत्रीचं अतुट बंधनः प्रदीपजी आणि अनिलदा

पुढे आणलं. लग्नानंतर संसाराच्या बंधनात जखडलेल्या अख्तरीबाई फैजाबादीला पुन्हा गातं केलं आणि बेगम अख्तर या नावाने नावारूपाला आणलं, चित्रपट संगीतात अरबी संगीत आणि आधुनिक ऑर्केस्ट्राचा वापर सुरू केला. अशी शेकडो उदाहरणं आहेत.

याशिवाय जे प्रशिक्षित गायक नव्हते अशा कितीतरी नवोदितांना स्वतः तालीम देऊन त्यांनी गायक बनवलं. आजचा अभिनेता गोविंदाचे वडील अरुणकुमारकडून दिलीपकुमारचा नायक म्हणून पहिला चित्रपट असलेल्या *ज्वारभाटा*मध्ये *'सांज की बेला, पंछी अकेला...'* हे गीत गाऊन घेतलं. तर कथ्थक नर्तकी सितारादेवी यांना १९४२मध्ये विचार करणं जागेअभावी शक्य नसलं तरी काही गीतं आळवल्याशिवाय ही श्रद्धांजली पूर्णच होऊ शकत नाही.

– तलत मेहमूदने १९४५मध्ये *राजलक्ष्मी*साठी पहिल्यांदा पार्श्वगायन केलं. पण त्याला खरी लोकप्रियता मिळाली ती चित्रपट *आरजू*(१९५०: दिलीपकुमार, कामिनी कौशल)मधील ते गाणं होतं *'अय दिल मुझे ऐसी जगह ले चल जहां कोई न हो...'*

–*'धीरे धीरे आ रे बादल मेरा बुलबुल सो रहा है...'*(१९४३-*किस्मत*) हे गाणं अरुणकुमार आणि अमीरबाईने गायलं होतं.

– *'सीने में सुलगते हैं अरमां...'* लता आणि तलत मेहमूदने हे गाणं *तराना*साठी थोरल्या मुलाचं विमान अपघातात आकस्मिक निधन झालं. धाकटा भाऊ अकाली काळाने ओढून नेला. अनिलदांचं मन मुंबईत रमत नव्हतं. पत्नी मीना कपूरसह ते दिल्लीला निघून गेले. तिथे स्थायिक होऊन संगीतसेवा करू लागले. त्यांचे पुत्र अमर-उत्पल आजही चित्रपट संगीतात सक्रिय आहेत.

मुकेश, रफी, किशोरदा, तलत वगैरे गायक तर कधीच काळाच्या पडद्याआड गेले. पण परमेश्वराच्या दरबारात नुसतेच चांगले गायक असून काय उपयोग. म्हणूनच चांगले संगीतकार असलेल्या अनिलदांनाही त्याने बोलावणं धाडलं असावं. अनिलदा त्या अखेरच्या प्रवासाला निघून गेलेत...